दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१७ ■ शनिवार, दि. १५ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -317 ■ Saturday, 15 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## रंग फेकण्यावरून चाकूचे वार; मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील थरार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दुचाकीवरून जाणाऱ्या तरुणाच्या अंगावर आधी रंग फेकला. तो डोळ्यांत गेल्याने दुचाकीचालकाने रंग फेकण्याबाबत विचारणा केली. त्याचा इतका राग आला, की रंग फ ेकणाऱ्यांनी दोन्ही दुचाकीस्वारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत चाकूचे वार करून रक्तबंबाळ केले. हा धक्कादायक प्रकार महावीर चौक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे जाणाऱ्या रोडवरील हॉटेल न्यू एलोरा लॉजिंगसमोर गुरुवारी (१३ मार्च) सायंकाळी सातला घडला.

ऋषिकेश रमेश करपे (वय २८, रा.ओम साईनगर, रांजणगाव शेणपुंजी) यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांचा जबाब पोलिसांनी नोंदवला. त्यात करपे यांनी सांगितले, की ते पत्नी, मुलगा, आई-वडील व लहान भावासह राहतात. ते रांजणगाव शेणपुंजीच्या गुड इयर कंपनीत नोकरी करतात. गुरुवारी (१३ मार्च) सायंकाळी सातला मेव्हणा ओंकारसोबत ते औषधी आणण्यासाठी समर्थनगरातील विजय मेडिकलला दुचाकी पॅशन प्रोने गेले होते. मेव्हणा मागे बसलेला होता. सायंकाळी साडेसातला महावीर चौक बाबा पेट्रोलपंप येथे पोहोचले असता महावीर चौकाकडून मध्यवर्ती बसस्थानक जाणाऱ्या रोडवरून जात असताना अचानक हॉटेल न्यू एलोरा लॉजिंगसमोर होळी खेळणाऱ्या सहा-सात मुलांपैकी एका मुलाने ऋषिकेश यांच्या तोंडावर रंग फेकला. तो डोळ्यांत गेल्याने ऋषिकेश यांनी गाडी थांबवली व रंग फेकणाऱ्या मुलाला अंगावर रंग का फेकला, अशी विचारणा केली.

त्यावर त्याने त्याच्या मित्रांना बोलावून वाद घालून सर्वांनी मिळून ऋषिकेशला लाथाबुक्क्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. रंग फेकणाऱ्या चेतन नावाच्या मुलाने चाकू काढला आणि ऋषिकेशच्या पोटावर वार केला. तो वार डाव्या बाजूच्या छातीखाली लागला. त्यानंतर चेतनने चाकूने पुन्हा दोन वार पोटात केले. ते कमरेच्या डाव्या व उजव्या बाजूला लागले. ऋषिकेश यांचा मेव्हणा ओंकार त्यांना वाचविण्यासाठी धावला असता त्याच्यावरही चाकूचे दोन वार केले. दोघांनाही त्याच अवस्थेत दुचाकीवरून पळ काढत क्रांती चौक पोलीस ठाण्यात आले. रक्तबंबाळ अवस्थेत दोघांना पाहून पोलिसांनी त्यांना तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले. दोघांवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी चेतन, आकाश, लखन, रोहित, सोनू, ऋषी, संकेत अशा ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे. ते मिळून आल्यानंतर त्यांची पूर्ण ओळख समोर येईल. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर तनपुरे करत आहेत.

## विठ्ठलाच्या मूर्तीवर रासायनिक लेपन; अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**सोलापूर :** अल्पावधीत रासायनिक लेपन परत करावे लागल्याविषयी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. विठ्ठलाच्या मूर्तीवर धर्मशास्त्रसंमत नसलेल्या रासायनिक लेपनास मंदिर महासंघ, वारकरी यांचा तीव्र विरोध आहे,ङ्ख अशी भूमिका मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी मांडली आहे.

श्री विठ्ठलाच्या मूर्तीवर परत एकदा रासायनिक लेपन करण्याच्या सूचना पुरातत्व विभागाने दिल्याची माहिती मिळत आहे. खरे तर यापूर्वी वर्ष २०२० मध्येही ते करण्यात आले. ते करण्यात आले तेव्हाच पुढे ८ ते १० वर्ष त्याला काही होणार नाही, असे सांगण्यात आले होते. असे होते, तर ४ वर्षापूर्वीच लेपन केलेले असताना ते परत परत का करावे लागते? लेपन ४ वर्षांतच करावे लागते याचा अर्थ 'यापूर्वीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले', असेच म्हणावे लागेल. खरे पहाता देवतेच्या मूर्तीवर कोणत्याही प्रकारे रासायनिक लेपन करणे, ही पूर्णतः धर्मशास्त्रविसंगत कृती आहे. मुळापासून उपाययोजना न काढता रासायनिक लेपनासारखी वरवरची उपाययोजना काढल्याने देवतेच्या मूर्तीवर विपरीत परिणाम होऊ शकतात, हेही ध्यानात घ्यायला हवे. त्यामुळे रासायनिक लेपनास मंदिर महासंघ आणि वारकरी यांचा तीव्र विरोध आहे.



## चुकीच्या समजुतीतून चाकूहल्ला; पेट्रोल चोरी करताना अल्पवयीन ताब्यात

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पारिजात नगर येथे एका तरुणावर झालेल्या चाकूहल्ल्याप्रकरणी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. मंगळवारी (११ मार्च) रात्री दहाच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी पुंडलिक नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी (१९ वर्षीय) आपल्या मित्रांसोबत गप्पा मारत असताना, तोंडाला रुमाल बांधलेल्या एका व्यक्तीने त्याच्याकडे येऊन जयभवानी नगरचा पत्ता विचारला. फिर्यादीने माहिती दिल्यानंतर तो पुन्हा गप्पांमध्ये मग्न झाला. त्याच वेळी, आरोपींनी अचानक त्याच्या मांडीवर चाकूने हल्ला केला आणि घटनास्थळावरून पसार झाले.

मध्यरात्री एमआयडीसी वाळूज पोलिस गस्त घालत असताना त्यांना दोन संशयित पेट्रोल चोरी करताना आढळले. चौकशीत त्यांनी हल्ल्याची कबुली दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी जुन्या वादातून एका विशिष्ट व्यक्तीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, पण चुकून तो दुसऱ्याच व्यक्तीवर झाला.

या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठा जमाव घटनास्थळी जमा झाला. एका डॉक्टरने तातडीने जखमीवर प्राथमिक उपचार केले, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पुंडलिक नगर व पारिजात नगर परिसरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास पुंडलिक नगर पोलिस करत आहेत.

## सतीश भोसले उर्फ खोक्याला पोलीस कोठडी

बीड : बीड जिल्ह्यातील शिरुरमध्ये घडलेल्या अम ानुष मारहाण प्रकरणातील आरोपी सतीश उर्फ खोक्या भोसले याला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे. सतीश भोसले याच्यावर राजकीय वरदहस्त असल्यामुळे या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले आहे. सतीश उर्फ खोक्या भोसलेने केलेल्या मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाला. यानंतर सतीशवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली. पण तोपर्यंत सतीश फरार झाला होता. अखेर त्याला उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून अटक करण्यात आली. उत्तर प्रदेश पोलीस आणि बीड पोलीस यांनी संयुक्त कारवाई करुन सतीश उर्फ खोक्या भोसलेला अटक केली. पोलिसांनी प्रयागराज न्यायालयातून हस्तांतरणाची कोठडी मागून घेतली. यानंतर बीड पोलिसांनी सतीश उर्फ खोक्या भोसले याला बीड जिल्ह्यातील शिरूर सत्र न्यायालयात हजर केले. न्यायालयाने दोन्ही बाजू जाणून घेतल्या. यानंतर न्यायालयाने तपासाकरिता आवश्यक म्हणून सतीश उर्फ खोक्या भोसले याला सात दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे.

## घरकामगाराने टप्प्याटप्प्याने घरफोडी करून ३ लाखांचा ऐवज लंपास

**छत्रपती संभाजीनगर :** मालकाच्या घरातच एका घरकाम गाराने टप्प्याटप्प्याने चोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे घरकामगारांवर ठेवला जाणारा विश्वास डळमळीत झाला असून, नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. चोरीत सोन्याचे शिक्के, सोन्याची चैन आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. ही चोरी सप्टेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीत झाली आहे.

याप्रकरणी उस्मानपूरा पोलिस ठाण्यात हरी मर्कड (रा. कांचनवाडी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यापारी हरप्रित सिंग अवतार सिंग (वय ६२, रा. उस्मानपूरा) यांनी घरकामासाठी आणि वृद्ध आईची देखभाल करण्यासाठी हा कामगार ठेवला होता. मात्र, त्यानेच वृद्ध आईच्या दुर्लक्षाचा फायदा घेत टप्प्याटप्प्याने घरातील मौल्यवान वस्तू लंपास केल्या. चोरीत कपाटातून २ लाख ४० हजार रुपये किमतीचे चार सोन्याचे शिक्के, १५ हजारांची सोन्याची चैन आणि ४५ हजारांची रोख रक्कम असा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी उस्म ानपूरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## नेत्यांची राजकीय धुळवड! दानवे म्हणतात, फक्त भगवा, तर शिंदे म्हणतात, भगवा रंग आवडेल त्यांनी आमच्याबरोबर यावं

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्याच्या विविध भागात होळी उत्सव मोठ्या उत्सवात साजरा केला जात आहे. आज (१४ मार्च) धूलिवंदन देखील उत्साहात साजरे होत असल्याचं पाहायला मिळत आहे. 'बुरा न मानो होली है!', असं म्हणत होळीचं सेलिब्रेशन केलं जातं. आता होळी सणाच्या निमित्ताने राज्याच्या राजकारणातील नेते एकमेकांना शुभेच्छा देतानाही पाहायला मिळत आहेत. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांना होळीच्या शुभेच्छा देत खोचक शब्दांत टीका केली आहे. तसेच माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी देखील विरोधकांवर टीका केली आहे, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विरोधकांना शुभेच्छा देत आमचा रंग भगवा आहे, ज्यांना भगवा रंग आवडेल त्यांनी आमच्याबरोबर यावं, असं म्हटलं आहे. दरम्यान, होळीच्या शुभेच्छा देतानाही नेत्यांम ध्ये आरोप-प्रत्यारोपाची राजकीय धुळवड पाहायला मिळाली आहे.

रावसाहेब दानवे काय म्हणाले?

राजकारणात कोणता रंग गडद करायचा? हे फक्त राज्यातील आणि देशातील जनतेच्या हातात आहे. कोणता रंग गडद करणं? कोणता रंग फिकट करणं हे सर्व जनतेच्या हातात आहे. आपण पाहिलं असेल की राज्यात विधानसभेच्या ज्या निवडणुका झाल्या त्यामध्ये जनतेनं शिक्कामोर्तब केलं की राज्यात फक्त आणि फक्त भगवा रंगच गडद होऊ शकतो. तसेच जो रंग भगव्याच्या विरोधात आहे, काही लोकांनी भगव्यावर हिरवा रंग लावला. लोकांना सांगायला भगवा, पण आत हिरवा. अशा लोकांना जनतेने नाकारलंङ्ख, असं म्हणत भाजपाचे नेते रावसाहेब दानवे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले? - आमचा रंग भगवा आहे. आता भगवा रंग ज्याला आवडेल त्यांनी आमच्या बरोबर यावं. भगवा रंग हा हिंदुत्वाचा रंग आहे. भगवा रंग हा वैश्विक आहे. भगवा रंग हा सनातन हिंदू धर्माचा आहे. भगवा रंग हा सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाणारा आहे. त्यामुळे ज्यांना कोणाला वाटेल या भगव्या रंगात न्हावून निघावं त्यांनी आमच्या बरोबर यावं, अशा शुभेच्छा देतोङ्ख, असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर खोचक टीका केली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं की आमचा रंग हा तिरंगा आहे, जो भारताचा रंग आहे, तो आमचा रंग आहे.

बावनकुळे काय म्हणाले?

नाना पटोले यांना माझ्या शुभेच्छा आहेत. त्यांना विरोधी पक्षात बसण्याचा कौल जनतेने दिलेला आहे. महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी आणि पारदर्शी व भ्रष्टाचारमुक्त सरकार चालण्यासाठी होळीच्या निमित्ताने नाना पटोलेंनी संकल्प करावा अशा माझ्या त्यांना शुभेच्छा, असं चंद्रशेखर बावनकुळेंनी म्हटलं आहे. विजय वडेट्टीवारांनी महाराष्ट्रातील चांगले प्रश्न मांडले पाहिजेत. आम्ही जो काही संकल्पनामा दिला, तो संकल्पनामा पुढे नेण्यासाठी आम्हाला विजय वडेट्टीवारांनी आम्हाला सातत्याने आठवण करून दिली पाहिजे. तसेच त्यांचा काँग्रेस पक्ष कसा मजबूत करता येईल याचीही काळजी त्यांनी घेतली पाहिजे. तसेच काँग्रेसमध्ये जे काही मनभेद आणि मदभेत आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न देखील वडेट्टीवारांनी केला पाहिजे, याच त्यांना शुभेच्छाङ्ख, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे.

उद्धव ठाकरे यांना माझी विनंती आहे की त्यांनी दररोज सभागृहात यावं. सभागृहात येऊन राज्य सरकारला चांगल्या गोष्टी सांगाव्यात. कारण उद्धव ठाकरे हे फक्त कधीतरीच सभागृहात येतातङ्ख, असं म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांना खोचक सल्ला दिला आहे.

## आरएसएस हे विष आहे, तुषार गांधींच्या विधानावरून वाद; माफीची मागणी होताच दिला स्पष्ट नकार!

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांनी केरळमध्ये एका कार्यक्रमादरम्यान केलेल्या विधानावरून चांगलाच वाद निर्माण झाला आहे. तुषार गांधींच्या हस्ते केरळच्या तिरुअनंतपुरममध्ये दिवंगत गोपीनाथन नायर यांच्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. यावेळी केलेल्या भाषणादरम्यान तुषार गांधींनी भारतीय जनता पक्ष व ठडड अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत विधान केल्यानंतर त्यावरून दोन्ही संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मात्र, आपण आपल्या भूमिकांवर ठाम असल्याचं तुषार गांधींनी स्पष्ट केलं आहे. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भात सविस्तर वृत्त दिलं आहे.

काय म्हणाले होते तुषार गांधी?

तुषार गांधींनी या कार्यक्रमादरम्यान भाजपा व आरएसएस यांच्यावर टीकात्मक टिप्पणी केली होती. ङ्गआपण भारतीय जनता पक्षाचा पराभव करू शकतो, पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विष आहे. ते या देशाचा आत्माच नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्याला या घडामोडींची भीती वाटायला हवी. कारण जर आत्माच नष्ट झाला, तर सारंकाही नष्ट होईलङ्ख, असं तुषार गांधी या कार्यक्रमात म्हणाले होते. तुषार गांधींच्या या विधानावरून भारतीय जनता पक्ष व आरएसएसकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. केरळमध्येच भाजपा व आरएसएसच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. काही कार्यकर्त्यांनी तुषार गांधी यांचा रस्ता अडवण्याचाही प्रयत्न केला. केरळमधील सत्ताधारी माकप व विरोधातील काँग्रेस पक्ष या दोघांनी या कृत्यांचा निषेध केला आहे.

मी माफी मागणार नाही - तुषार गांधी

दरम्यान, भाजपा व आरएसएसकडून तुषार गांधींनी माफी मागण्याची व विधान मागे घेण्याची मागणी केली जात आहे. त्यावर तुषार गांधींनी स्पष्ट नकार दिला आहे. त्यांची इच्छा आहे की मी जे काही म्हणालो त्याबद्दल माफी मागावी. माझं विधान मागे घ्यावं. पण मी म्हणालो मी ते करणार नाही. मी जेव्हा काही बोलतो, तेव्हा मी त्याबद्दल माफी मागावी लागेल किंवा ते विधान मागे घ्यावं लागेल असा विचार अजिबात करत नाही, असं तुषार गांधी शुक्रवारी कोचीतील एका कार्यक्रमादरम्यान म्हणाले. या असल्या प्रकारांमुळे गद्दारांना लोकांसमोर उघडं पाडण्याचा माझा निर्धार आणखी पक्का होतो. कारण हा लढा स्वातंत्र्यसंग्रामापेक्षाही जास्त महत्त्वाचा आहे. आता आपल्या सर्वांसमोर एकच शत्रू आहे. त्या सगळ्यांना उघडं पाडायलाच हवं. मला तर भीती वाटते आहे की महात्मा गांधींच्या मारेकऱ्याचे वंशज आता गांधींच्या पुतळ्यावरही हल्ला करतील की काय. सवयीप्रमाणे ते आता माझ्या पणजोबांच्या पुतळ्यावरही गोळ्या झाडणार का?, असा प्रश्नही तुषार गांधींनी यावेळी उपस्थित केला.

## दूध दरात दोन रुपयांनी वाढ

**मुंबई :** उन्हाळ्यामुळे दूध संकलनात घट झाली आहे. आईस्क्रीमसह अन्य दुग्धजन्य पदार्थांसाठी दुधाची मागणी वाढली आहे. त्यामुळे दूध दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाने घेतला आहे. नवी दरवाढ आजपासून, शनिवारपासून लागू होणार आहे. पुण्यातील कात्रज दूध संघात नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीला दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिक संघटनेचे ४७ सदस्य उपस्थित होते. या बैठकीत गाय आणि म्हशीच्या दूध दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत दूध भेसळ आणि पनीर भेसळ रोखण्यावर सविस्तर चर्चा झाली. भेसळ आणि शेतकऱ्यांचे थकीत अनुदान लवकरात लवकर मिळण्यासाठी दुग्ध व्यवसाय विकास मंत्री आणि आयुक्तांना भेटण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष गोपाळराव मस्के आणि मानद सचिव प्रकाश कुतवळ आदींनी यांनी दिली.


## महिला सुरक्षेचा प्रश्न कधी सुटणार?

देे पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकावरून दररोज एक लाख प्रवासी प्रवास करतात. दक्षिण महाराष्ट्र, कोकण, मुंबई तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावांशी, जिल्ह्यांशी आणि तालुक्यांशी स्वारगेट बसस्थानकातून गाड्या सुटतात आणि येतात. अशा मध्यवर्ती आणि गजबजलेल्या बसस्थानकावर एवढे सुरक्षारक्षक, एसटी कर्मचाऱ्यांचा वाढता वावर आणि जवळच पोलीस ठाणे असताना एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षांच्या तरुणीवर एकदा नव्हे तर दोनदा अत्याचार करण्यात आला. हे प्रकरण माध्यमांनी उचलून धरल्यानंतर प्रशासन हलले, काही उपाययोजना केल्या; परंतु शिवशाहीमध्ये अत्याचार करणाऱ्या या आरोपीवर अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेता पोलिसांनी जामीन कसा मिळू दिला, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. नगर जिल्ह्यातील सुपे, शिरूर, शिक्रापूरसह अन्य ठिकाणी त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. महिलांची लूट, दरोडा आदी गुन्हे दाखल असताना तो जामिनावर बाहेर येतो, न्यायालयीन प्रक्रियेत आरोपांची सिद्धता न झाल्याने त्याला गुन्हे करण्याची संधी मिळते. गुन्हे दाखल झालेला दत्तात्रय गाडे तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवतो, यासारखा जगात दुसरा विनोद नाही. गाडे हा सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात दिसून आले. त्याने अत्याचाराच्या या घटनेव्यतिरिक्तही काही मुलींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यासाठी तो आपण पोलीस असल्याचे भासवायचा. त्याच्या संपर्कामध्ये आलेल्या राजकीय व्यक्ती आणि पोलीस कर्मचाऱ्यांकडे चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र या घटनेनंतर महिला सुरक्षिततेच्या गंभीर मुद्द्याचे काही नवे पैलू प्रकाशात आले आहेत.

गाडेवर आतापर्यंत सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गाडे स्वारगेट बसस्थानकावर वारंवार जात असायचा. त्यामुळे त्याला परिसरातील पूर्ण माहिती होती. त्याचाच फायदा घेऊन त्याने पीडित तरुणीला बसस्थानकावरील निर्जन स्थळी घेऊन जाऊन अत्याचार केला. स्वारगेट बसस्थानकावर महिला, मुलींची छेडछाड होत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही पोलिसांकडे येत होत्या. त्या त्या वेळी गस्त घालून, संशयितांची चौकशी करून त्यांना हाकलून देण्यात येत होते; मात्र या वेळी संबंधित मुलगी एकटी असल्याचा आणि अंधाराचा फायदा घेत नराधम आरोपीने अत्याचार केला. गाडे याच्या एका मैत्रिणीला भोरवरून चौकशीसाठी पुण्यात आणण्यात आले. त्या वेळी तिने पोलिसांना धक्कादायक माहिती दिली. तिच्या उत्तरातून गाडेने महिलेवर अत्याचार केल्याची ही पहिलीच घटना नसावी, यापूर्वीही त्याने महिलांना त्रास दिला असावा, असा संशय आहे. त्या दृष्टीने पोलीस आता तपास करत आहेत. गुन्हे शाखेने गाडे याच्या दहा मित्र-मैत्रिणींची चौकशी केली. या सगळ्यांकडून त्याच्याबद्दल खडान्खडा माहिती पोलिसांनी काढून घेतली आहे. त्याचबरोबर तो एका प्रमुख पक्षाच्या लोकप्रतिनिधीचा ‘कार्यकर्ता’ असल्याचीही धक्कादायक माहिती आहे. त्याच्या संपर्कात राजकीय व्यक्ती, पोलीस कर्मचारी असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. ‘पीएमपी’, ‘एसटी’ स्थानकांवर रेंगाळत, आपण पोलीस असल्याचे भासवून महिला, तरुणींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न तो करायचा. स्वारगेट बसस्थानकावर घडलेल्या घटनेनंतर प्रशासनाला जाग आली. सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आले. आगारप्रमुख आणि स्थानकप्रमुखांवरची कारवाई ही पश्चातबुद्धी आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून काही गर्दुले बसचा वापर लॉज म्हणून करत असल्याचा प्रकार उघड झाला. या गुन्ह्यानंतर पुणे शहरातील शिवाजीनगर बस स्थानक, स्वारगेट बस स्थानक, नाशिक, नागपूर तसेच अन्य स्थानकांमध्ये पाहणी केली गेली, तेव्हा अनेक भागात वीजपुरवठा बंद असल्याचे आढळले. घटना घडवून २४ तासही होत नाही तोच पुन्हा दिव्याखाली अंधार असे चित्र पाहायला मिळाले. स्वारगेटमध्ये तिकीट काउंटरच्या ठिकाणी वीजच नव्हती. महिलांना भीती वाटत होती. त्याच बाजूला अनेक पुरुष झोपलेले पाहायला मिळाले. तिथेही अजिबात प्रकाश नव्हता. पुण्याच्याच दुसऱ्या मोठ्या शिवाजीनगर बस स्थानकामध्येही पाहणी केली गेली तेव्हा एकही पोलीस अथवा सुरक्षारक्षक दिसला नाही; मात्र मोठ्या प्रमाणावर गर्दुल्यांचा वावर दिसला. शिवाय स्थानकातल्या अनेक भागांमध्ये अंधार होता. शिवाजीनगर बस आगाराच्या बाहेर असणाऱ्या मोकळ्या जागेत प्रवासी झोपलेले दिसले. देशात अत्याचाराच्या घटनांमध्ये ९६ टक्के आरोपी हे महिलांच्या ओळखीतील कोणी तरी असतात. विशेष धक्कादायक बाब म्हणजे अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये शंभरपैकी २७ आरोपींनाच शिक्षा होते. या आकडेवारीनुसार भारतात वर्षभरात महिलांविरोधात चार लाखांहून अधिक गुन्हे दाखल केले जातात. या गुन्ह्यांमध्ये अत्याचारच नाही, तर छेडछाड, हुंडाबळी, अपहरण, ट्रॅफिकिंग, ॲसिड ॲटक यासारख्या गुन्ह्यांचाही समावेश आहे. देशात कठोर कायदे आणि शिक्षेची तरतूद केल्यानंतर महिलांविरोधातील गुन्हे कमी होत नाहीत.

# गणित: विज्ञानाची महाराणी

### (आंतरराष्ट्रीय गणित दिवस.)



युनेस्कोच्या कार्यकारी परिषदेने २०५व्या अधिवेशनात १४ मार्च हा आंतरराष्ट्रीय गणित दिवस म्हणून घोषित केला गेला. नोव्हेंबर २०१९मध्ये युनेस्कोच्या सर्वसाधारण परिषदेच्या ४०व्या सत्राने ते स्वीकारले गेले. आईडीएमचा उद्घाटन सोहळा दि.१४ मार्च २०२० रोजी झाला. तेव्हाची थीम गणित सर्वत्र आहे. या थीमच्या व्याप्तीमध्ये घडलेल्या घटना आणि क्रियाकलापांचे विहंगावलोकन आढळून येते. २०२१मध्ये थीम होती मॅथेमॅटिक्स फॉर अ बेटर वर्ल्ड. २०२२ची थीम मॅथेमॅटिक्स युनिट्स होती, तर २०२३ची थीम प्रत्येकासाठी गणित, ही होती. दरवर्षी उत्सवाची चव वाढवण्यासाठी, सर्जनशीलता वाढवण्यासाठी, गणित आणि सर्व प्रकारच्या फील्ड, संकल्पना आणि कल्पना यांच्यातील संबंधांना प्रकाश देण्यासाठी एक नवीन थीम जाहीर केली जाते. गणित आणि गणना हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. शाळेत गणित शिकण्यापासून ते आपल्या नियमित जीवनात अमलात आणण्यापर्यंत या विषयाचे महत्त्व आपण दुर्लक्षित करू शकत नाही. गणित शिकण्यातही मजा आहे. युक्त्या आणि टिपा ते अधिक मनोरंजक बनवतात. आपल्या नियमित जीवनात गणित शिकण्याच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय गणित दिन साजरा केला जातो. आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, महावीर, भास्कर दुसरा, श्रीनिवास रामानुजन आणि इतर अनेक गणितज्ञांच्या योगदानाने गणिताचे क्षेत्र समृद्ध झाले आहे. या विशेष दिवशी, लोक त्यांचे स्मरण करतात, त्यांचा आदर करतात आणि त्यांच्या गणिताच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचे कौतुक करतात.

आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त, शैक्षणिक संस्था, गणितीय संस्था आणि इतर संस्था विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करतात. यामध्ये सेमिनार, कार्यशाळा, गणितीय प्रश्नमंजुषा आणि प्रख्यात गणितज्ञांची व्याख्याने यांचा समावेश असतो. रामानुजनसारख्या शास्त्रज्ञांच्या योगदानाचे स्मरण करणेच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये आणि सामान्य लोकांमध्ये गणिताविषयीची सखोल प्रशंसा वाढवणे हे ध्येय आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त, या क्षेत्रात असामान्य योगदान देणाऱ्या गणितज्ञांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्रदान केले जातात. हे पुरस्कार केवळ समकालीन गणितज्ञांच्या कर्तृत्वालाच ओळखच नाहीत तर तरुण मनांना गणितात करिअर करण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याचे साधन म्हणूनही काम करतात. आंतरराष्ट्रीय गणित दिवस आपल्या दैनंदिन जीवनात गणिताच्या सर्वव्यापीतेवर प्रतिबिंबित करण्याची संधी प्रदान करतो.

सध्या अंकगणित ऑपरेशन्सपासून आपल्या डिजिटल जगाला सामर्थ्यवान जटिल अल्गोरिदम पर्यंत, गणित असंख्य प्रक्रियांचा कणा बनवते. बँकिंग, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, अर्थशास्त्र आणि विविध वैज्ञानिक शाखा विश्लेषण, मॉडेलिंग आणि निर्णय घेण्यासाठी गणिताच्या तत्त्वांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यातील समन्वय निर्विवाद आहे. वैज्ञानिक शोध आणि तांत्रिक नवकल्पनांमध्ये अनेकदा गुंतागुंतीचे गणितीय मॉडेलिंग आणि सिम्युलेशन यांचा समावेश होतो. भौतिकशास्त्र, संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी यांसारखी क्षेत्रे सिद्धांत, डिझाइन प्रयोग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी गणितीय फ्रेमवर्कवर अवलंबून असतात.

भारतीय गणितज्ञांचेही खुपच मोठे योगदान आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिवस संपूर्ण इतिहासात भारतीय गणितज्ञांच्या योगदानाची कबुली देण्याची संधी देखील प्रदान करतो. श्रीनिवास रामानुजन व्यतिरिक्त, भारताने आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त आणि भास्कर खख यासह इतर अनेक प्रसिद्ध गणितज्ञ निर्माण केले आहेत. त्यांच्या कार्याने अनेक गणिती तत्त्वे आणि संकल्पनांची पायाभरणी केली जी आजही प्रासंगिक आहेत.

गणितज्ञांच्या कर्तृत्वाचा उत्सव साजरा करताना, आंतरराष्ट्रीय गणित दिन देखील गणिताच्या शिक्षणातील आव्हानांकडे लक्ष वेधतो. जगाच्या अनेक भागांमध्ये, विद्यार्थ्यांना गणिताशी संघर्ष करावा लागतो आणि हा विषय अधिक सुलभ आणि आकर्षक बनवण्याची गरज आहे. अभिनव अध्यापन पद्धती, परस्परसंवादी शिक्षण संसाधने आणि तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण याद्वारे गणिताचे शिक्षण वाढवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. गणिताच्या क्षेत्रातील लक्षणीय प्रगती असूनही, गणिताच्या शिक्षणाशी निगडीत आव्हाने आहेत ज्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिन या आव्हानांवर चिंतन करण्याची आणि सर्व स्तरांवर गणिताचे शिक्षण वाढवण्याचे मार्ग शोधण्याची संधी देतो. गणिताची चिंता संबोधित करणे अत्यावश्यक आहे. गणिताची चिंता ही एक सामान्य समस्या आहे जी बऱ्याच व्यक्तींना गणिताशी पूर्णपणे संलग्न होण्यापासून रोखते. राष्ट्रीय गणित दिवस गणिताच्या चिंतेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि ती कमी करण्यासाठी धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करू शकतो.

गणिताबद्दल प्रेम वाढवण्यासाठी सकारात्मक आणि आश्वासक शिक्षण वातावरण तयार करणे महत्त्वाचे आहे. समावेशकतेला प्रोत्साहन देणेही गरजेचे आहे. गणिताच्या शिक्षणात सर्वसम ावेशकतेला चालना देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिवस लिंग, सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी किंवा भौगोलिक स्थानाचा विचार न करता सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार गणित शिक्षणाच्या समान प्रवेशाच्या महत्त्वावर जोर देण्याची संधी प्रदान करतो. गणिताच्या क्षेत्रातील विविधतेला प्रोत्साहन देणे ही नवकल्पना आणि सर्जनशीलतेला चालना देण्याची गुरुकिल्ली आहे.

गणिताच्या शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण शिकण्याचे अनुभव वाढवू शकते आणि गणिताच्या संकल्पना अधिक सुलभ बनवू शकते. गणिताचे शिक्षण अधिक आकर्षक आणि प्रभावी बनवण्यासाठी इंटरएक्टिव्ह सॉफ्टवेअर, सिम्युलेशन आणि ऑनलाइन संसाधने यासारख्या तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय गणित दिन हा एक उत्प्रेरक ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय गणित दिवस केवळ भारतापुरता मर्यादित नाही, त्याला जागतिक अनुनाद आहे. जगभरातील गणितज्ञ आणि शिक्षक या उत्सवात सामील होतात, गणितीय शोधांचे आंतरराष्ट्रीय स्वरूप आणि गणितीय संशोधन चालविणारे सहयोगी प्रयत्न यावर भर देतात. गणितीय संस्था आणि ऑर्गनायझेशन या दिवसाचा उपयोग विचारांच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गणिताच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यासाठी करतात. गणिताचा समाजावर होणारा परिणाम मोठा आहे. गणित, ज्याला ‘विज्ञानाची राणी‘ असे संबोधले जाते, ते आपल्या जीवनातील विविध पैलूंमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्याचे ॲप्लिकेशन सैद्धांतिक अमूर्ततेच्या क्षेत्रापुरते मर्यादित नाहीत परंतु विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आणि बरेच काही यासारख्या क्षेत्रांमध्ये व्यावहारिक समाधानापर्यंत विस्तारित आहेत.

तांत्रिक प्रगती अविस्मरणीय आहे. २१व्या शतकातील तंत्रज्ञानाचा लँडस्केप गणितावर खूप अवलंबून आहे. संगणक अल्गोरिदमपासून डेटा विश्लेषणापर्यंत, गणिती तत्त्वे तंत्रज्ञानाच्या विकासावर आधार देतात जे आपल्या दैनंदिन जीवनाला आकार देतात.

राष्ट्रीय गणित दिवस हा गणित आणि तंत्रज्ञान यांच्यातील सहजीवन संबंधाची आठवण करून देतो. गणित ही विज्ञानाची भाषा आहे, जी नैसर्गिक जग समजून घेण्यासाठी एक पद्धतशीर आणि अचूक फ्रेमवर्क प्रदान करते.

वैज्ञानिक प्रगती आणि शोध अनेकदा गणितीय मॉडेल्स आणि समीकरणांसह असतात जे घटनांचे वर्णन करतात आणि अंदाज लावतात. राष्ट्रीय गणित दिवस वैज्ञानिक प्रगतीमध्ये गणिताची भूमिका साजरा करतो. अर्थशास्त्र आणि वित्त क्षेत्रामध्ये, गणित आर्थिक प्रणालींचे मॉडेलिंग, बाजारातील ट्रेंडचा अंदाज लावणे आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया अनुकूल करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अर्थशास्त्रातील गणिती तत्त्वांच्या वापरामुळे जागतिक आर्थिक धोरणांना आकार देणारी वित्तीय मॉडेल्स आणि धोरणे विकसित झाली आहेत.

तांत्रिक प्रगती, वैज्ञानिक शोध आणि आर्थिक उपयोगांवर गणिताचा प्रभाव स्पष्ट दिसत असला तरी, त्याचा प्रभाव दैनंदिन जीवनातही आहे. वैयक्तिक आर्थिक व्यवस्थापनापासून ते स्वयंपाक आणि घर सुधारणा प्रकल्पांपर्यंत, दैनंदिन क्रियाकलापांच्या विविध पैलूंमध्ये गणिती संकल्पना विणल्या जातात. राष्ट्रीय गणित दिवस लोकांना त्यांच्या जीवनातील गणिताचे सर्वव्यापी स्वरूप ओळखण्यास आणि त्याचे कौतुक करण्यास प्रोत्साहित करतो. आपण आंतरराष्ट्रीय गणित दिवस साजरा करत असताना, गणिताच्या भविष्याकडे पाहणे आणि उदयोन्मुख ट्रेंडची अपेक्षा करणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्सच्या गणितासह एकत्रीकरणामुळे गणितीय संशोधन आणि ॲप्लिकेशन्सच्या लँडस्केपला आकार मिळण्याची शक्यता आहे. आधुनिक आव्हानांचे आंतरविद्याशाखीय स्वरूप गणितज्ञांना विविध क्षेत्रातील तज्ञांसह सहयोग करण्यास सांगतात. आंतरराष्ट्रीय गणित दिवस हा गणितज्ञांच्या चिरस्थायी वारशाचा आणि समाजावरील त्यांच्या प्रभावाचा पुरावा आहे. हे विश्वातील रहस्ये उलगडण्यात गणिताच्या सौंदर्याची आणि सामर्थ्याची आठवण करून देणारे आहे. आपण हा दिवस साजरा करत असताना, आपण केवळ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मृतीचा सन्मान करू नये, तर आपल्या वेगाने विकसित होत असलेल्या जगात गणिताला अधिक सुलभ, आकर्षक आणि संबंधित बनवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांनाही मान्यता देऊ या. गणित, त्याच्या असीम शक्यतांसह, प्रेरणा देत राहते आणि भविष्याला आकार देत राहते, आंतरराष्ट्रीय गणित दिन हा बौद्धिक कुतूहल, शोध आणि अदम्य मानवी आत्म्याचा उत्सव बनवतो.

दि.१४ मार्च रोजी सेमिनार, कार्यशाळा, व्याख्याने आणि गणित स्पर्धा यासह विविध कार्यक्रम आणि उपक्रमांसह हा दिवस साजरा केला जातो. शैक्षणिक संस्था, गणितीय संस्था आणि संशोधन संस्था अनेकदा गणिताचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करतात. गणित महत्वाचे का आहे? तर, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आणि वित्त यांसह विविध क्षेत्रांमध्ये गणित म हत्त्वपूर्ण आहे. हे नैसर्गिक जग समजून घेण्यासाठी आणि वर्णन करण्यासाठी एक वैश्विक भाषा प्रदान करते. अनेक तांत्रिक प्रगती आणि वैज्ञानिक शोधांसाठी गणितीय संकल्पना आणि तंत्रे मूलभूत आहेत.

!! जागतिक गणित दिनाच्या माझ्या देशबांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## मोजे काटेपिंपळगाव ता.गंगापुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचा परिसर सुशोभिकरण करण्यासाठी न्यायविभागामार्फत १५ लक्ष रुपयाचा कागदोपत्री खर्च दाखवून शासनाची फसवणूक

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या राज्य समाज कल्याण विभाग मोफत काटेपिंपळगाव तालुका गंगापूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण व. पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १५. ०० लक्ष रुपयाचे काम केवळ वॉल कंपाउंड मध्ये खर्च केले, जे काम करायला पाहिजे होते मात्र ते काम केले नाही. कागदोपत्री खर्च दाखवून शासनाची फसवणूक करून सदर निधीचे पैसे हडप केले .त्यामुळे आमची अशी विनंती आहे. की सध्या रियल कामाची चौकशी करून,चौकशी होने कामी तक्रारदारासह तीन सदस्य समिती नेमून चौकशी ४ दिवसात करावी तथा ठेकेदार काळ्या यादीत नाव टाकण्यात यावे व सदर चौकशीमध्ये दोषी आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा



दाखल करावा व निधी देऊ नये दिलेले पैसे शासनाला परत करण्यात यावे.

तरी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा . सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयात, छत्रपती संभाजी नगर यांना निधी ठेकेदारास देऊ नये असे पत्र दिलेले असून आज पावेतो कार्यवाही झालेली नाही म्हणून दिनांक ११/०३/२०२५ रोजी आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत हे काम चालू करण्यात आले होते, सार्वजनिक बांधकाम खाते, गंगापूर (पश्चिम) यांना दिनांक १९/ ०९/ २०२४ रोजी निवेदन दिलेले होते परंतु कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही तक्रारदारचे म्हणणे ऐकून घेतले नाही व त्यांच्या स्तरावरून कुठलाही प्रकारचा तक्रारदारास पत्रव्यवहार करण्यात आला नाही म्हणून दिनांक ११/०३/२०२५ रोजी आम्ही खाली साह्य करणारे मा. जिल्हाधिकारी साहेब ,छत्रपती संभाजी नगर येथे आमरण उपोषणास बसणार आहे यांची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील याचीळ नोंद घ्यावी. परंतु गंगापूरचे विरोडकरक्ष साहेब हे गावात येऊन दमदाटी करून हुकूमशाही पद्धतीने म्हणाले की, तुम्ही उपोषणाला बसा नाहीत तर गड्ड्यात मरा माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही माझे हात फार वरपर्यंत पोहोचलेले आहेत असे म्हणाले. म्हणून विरोडकर साहेब यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही नम्र विनंती. छ.संभाजीनगर जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडून योग्य न्याय मिळावा यासाठी अरविंद यशवंत सोनवणे, अण्णासाहेब आसाराम सोनवणे, अण्णासाहेब देवराव सोनवणे, किसनराव येडूजी सोनवणे, भाऊसाहेब कुंडलिक जाधव, शिवाजी संभाजी सोनवणे हे सर्व जण अमरण उपोषणाला बसले आहे.

## खुलताबाद पोलीस कायदा सुव्यवस्था राखण्यास अपयशी..!

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद येथे गेल्या सहा दिवसा पासून अनेक वेळी सोशल मिडीयावर वादग्रस्त पोस्ट करत दोन सम ाजात भांडण लावण्याचा प्रकार काही तरुण करत या मुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊन खुलताबाद शहरात कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे प्रश्न निर्माण झाला असता,सोशल मीडियाच्या माध्यमातून औरंगजेब समाधी संदर्भात एका तरुणांनी आपल्या इंस्टाग्रामवर सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल केल्याने नंतर दोन समाजांमध्ये तणाव निर्माण झाले होते,

मात्र जशी खुलताबाद येथे सुरू असलेले अनेक अवैध धंदे वाल्याकडून वेळेवर वसुली केले जाते तसेच, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी खुलताबाद पोलिसांची आहे..!

खुलताबाद शहरासह तालुक्यात शांतता अबाधित ठेवण्याचे कर्तव्य खुलताबाद करांचे असले,तरीही कायदा व सुव्यवस्था राखणे ही सर्वस्वी खुलताबाद पोलिसांची जबाबदारी आहे.

विशेष म्हणजे सध्या सोशल मीडिया हा तरुणाईच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्या पासून रात्री झोपेपर्यंत तरुण फेसबुक,ट्विटर, इन्स्टाग्राम,व्हॉट्सअप सारख्या माध्यम ांवर सक्रिय असतात.मात्र, त्याचा गैरवापर झाल्यास समाजात अशांतता निर्माण होण्याची शक्यता असते..

# द्रमुक सरकारने, केंद्र सरकारने मंजुरी दिलेल्या रुपयाच्या चिन्हाला तमिळनाडू सरकारचे एक प्रकारे आव्हान

**तमिळनाडू** सरकार व केंद्र सरकारमध्ये भाषेच्या मुद्यावरून वाद चालू असतानाच गुरुवारी (१३ मार्च) तमिळनाडूच्या विधानसभेत राज्याचा २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. या अर्थसंकल्पात रुपयाच्या या चिन्हाऐवजी तमिळ भाषेतील रुबईचं (तमिळमध्ये रुपये) नवं चिन्ह वापरलं आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे भाषेवरून चालू असलेला वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. तमिळनाडू सरकारने तमिळ भाषेतील (रु) हे अक्षर रुपयाचं चिन्ह म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे.

द्रमुक सरकारने केंद्र सरकारने मंजुरी दिलेल्या रुपयाच्या चिन्हाला एक प्रकारे आव्हान दिलं असलं तरी एका गोष्टीकडे त्यांनी लक्ष दिलं नाही, ते म्हणजे रुपयाचं हे चिन्ह एका तमिळ माणसानेच बनवलं आहे. विशेष म्हणजे द्रमुक नेत्याच्या मुलानेच हे चिन्ह साकारलं आहे. हे चिन्ह साकारणारे उदयकुमार धर्मलिंगम यांचे वडील द्रमुकचे नेते व आमदार होते.

उदयकुमार यांनी स्टॅलिन सरकारच्या निर्णयावर भाष्य करणं टाळलं



तमिळनाडू सरकारने रुपयाच्या चिन्हाबाबत घेतलेल्या निर्णयावर देशभरातून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. दरम्यान, हे चिन्ह साकारणाऱ्या उदयकुमार यांनी स्टॅलिन सरकारच्या निर्णयावर भाष्य करणं टाळलं. उदयकुमार धर्मलिंगम हे भारतातील प्रसिद्ध डिझाइनर आहेत. त्यांनीच रुपयाचं हे चिन्ह डिझाइन केलं होतं. उदयकुमार यांचा जन्म १० ऑक्टोबर १९७८ रोजी तमिळनाडूमधील कल्लाकुरिची येथे झाला होता. ते सध्या आयआयटी गुवाहाटीमध्ये प्राध्यापक म्हणून अध्यापनाचं काम करत आहेत. ते सध्या गुवाहाटीत वास्तव्यास आहेत.

तो केवळ योगायोग : डी. उदयकुमार

पीटीआयने उदयकुमार यांच्याशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, या घटनेवर माझी काहीच प्रतिक्रिया नाहीये. तमिळनाडू सरकारला वाटलं असेल की रुपयाच्या चिन्हात बदल करण्याची आवश्यकता आहे किंवा त्यांना आपल्या भाषेतील अक्षराचा वापर करून नवं चिन्ह बनवावं असं वाटलं असेल तर ते तसं करू शकतात. हा निर्णय राज्य सरकारचा आहे. यावर प्रतिक्रिया देण्यासाठी माझ्याकडे काहीच नाही. तसेच एका तमिळ व्यक्तीने, द्रमुक पक्षाशी संबंधित व्यक्तीने ते चिन्ह बनवलं होतं हा केवळ योगायोग होता.

**मुलाने बनवलेल्या चिन्हाबद्दल एन. धर्मलिंगम काय म्हणाले होते?**

उदयकुमार धर्मलिंगम यांचे वडील एन. धर्मलिंगम हे द्रमुकचे आमदार होते. २०१० मध्ये रुपयाचा लोगो तयार करण्यासाठी देश पातळीवर स्पर्धा घेण्यात आली होती. त्या स्पर्धेत उदयकुमार यांच्या लोगोने बाजी मारली होती. त्यानंतर रिझर्व्ह बँकेसह केंद्र सरकारने रुपयाचं हे चिन्ह भारतीय चलनाचा अधिकृत लोगो म्हणून वापरण्यास मान्यता दिली.

# 'पंतप्रधान इंटर्नशिप योजना', लाभ घेण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंतप्रधान इंटर्नशिप योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत २१ ते २४ वर्षे वयोगटातील तरुणांना इंटर्नशिप दिली जाणार आहे. कोणत्याही ठिकाणी नोकरी करीत नसलेल्या युवकांसाठी ही योजना आहे. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

**पात्रता :**

- वय २१ ते २४ वर्षे यादरम्यान असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक पात्रता १० वी पास/ १२ वी पास/ आयटीआय / डिप्लोमा/ पदवीधर
- रुपये ८ लाखाच्या आतील उत्पन्न मर्यादा असणे आवश्यक आहे.
- NAPS / NATS अंतर्गत अ‍ॅप्रेंटीस केलेली नसावी.
- कुटुंबातील सदस्य(यामध्ये आई-वडील, स्वत शासकीय सेवेत नसलेला व्यक्ती अर्ज करू शकेल.
- पुर्णवेळ शिक्षण घेत नसलेला उमेदवार यासाठी पात्र असेल.

**अर्ज कसा करावा :**

- या योजनेसाठी अर्ज करुन इच्छिणाऱ्या उमेदवारांनी htt{://{minternsh{i.mca.gov.in/ या वेबसाईटवर प्रोफाईल तयार करून विविध क्षेत्रातील इंटर्नशिपसाठी अर्ज करावा
- उमेदवार अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत तीन इंटर्नशिपसाठी अर्ज करु शकतात.
- अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२५ आहे.

पंतप्रधान इंटर्नशीपमधून मिळणारे लाभ :

- या अंतर्गत युवकांना १२ म हिन्यांसाठी इंटर्नशिप मिळेल.
- इंटर्नशीपसाठी रुजू झाल्यावर सुरुवातीला एकवेळचे सहा हजार रुपये एकरकमी अनुदान दिले जाईल.
- त्यानंतर प्रत्येक महिन्यासाठी ५ हजार रुपये विद्यावेतन दिले जाईल.

**विमा सुरक्षा :**

- योजनेमध्ये सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना १२ महिन्यासाठी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत सुरक्षा प्रदान करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावे,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

# होळीचा रंग लावण्यास नकार दिल्याने राग अनावर झाला, तरुणाची गळा दाबून हत्या; धक्कादायक घटनेने खळबळ

**देशभरात** विविध ठिकाणी होळीचा उत्सव मोठ्या उत्सवात साजरा केला जात आहे. आज (१४ मार्च) धूलिवंदन देखील उत्साहात साजरे होत असल्याचं पाहायला मिळत आहे. 'बुरा न मानो होली है!', असं म्हणत होळीचं सेलिब्रेशन केलं जातं. मात्र, होळीच्या आधी रंग लावण्यास नकार दिल्याने तीन जणांनी एका २५ वर्षीय तरुणाचा गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राजस्थानमधील दौसा जिल्ह्यात ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी या दिलेल्या माहितीनुसार ही घटना बुधवारी सायंकाळी रालावस गावात घडली. रालवास गावातील रहिवासी अशोक, बबलू आणि कालूराम हे मृत हंसराज नावाच्या व्यक्तीला रंग लावण्यासाठी त्याच्याकडे एका स्थानिक ग्रंथालयात गेले होते. हंसराज हा स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. पण तेथे गेल्यानंतर हंसराजने रंग लावण्यास नकार दिला. याचा राग आल्याने अशोक, बबलू आणि कालूराम यांनी हंसराजला लाथाबुक्यांनी आणि बेल्टने मारहाण केली. त्यानंतर या तिघांपैकी एका आरोपीने हंसराजचा गळा दाबून हत्या केली, अशी माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक दिनेश अग्रवाल यांनी यांनी दिली. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

दरम्यान, मृताच्या कुटुंबातील सदस्यांनी आणि ग्रामस्थांनी हंसराजचा मृतदेह घेऊन निषेध करत आंदोलन केलं. गुरुवारी पहाटे १ वाजेपर्यंत परिसरातील राष्ट्रीय महामार्ग रोखला होता. हंसराजच्या कुटुंबाला ५० लाख रुपये भरपाई तसेच त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी आणि आरोपी तिघांना तात्काळ अटक करण्याची मागणी आंदोलकांनी केली. यानंतर पोलिसांच्या आश्वासनानंतर अखेर आंदोलकांनी आंदोलन मागे घेतलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

**राजस्थानमध्ये सुरक्षेत वाढ**

होळी आणि शुक्रवारच्या नमाजाच्या पार्श्वभूमीवर राजस्थानमध्ये सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात शांतता समितीच्या बैठका झाल्या आहेत. राजस्थानचे पोलीस महासंचालक उत्कल रंजन साहू यांनी सांगितलं की, राज्यातील पोलीस कर्मचारी नेहमीच आपले कर्तव्य कर्तव्यनिष्ठेने पार पाडतात जेणेकरून आपण आणि आपण सर्वजण हा सण पारंपारिक उत्साहाने साजरा करू शकू.

# दिनांक १६ मार्च वार रविवारी रोजी. चर्मकार समाज मेळाव्याचे आयोजन. व चर्मकार समाजातील कार्यकर्त्यांचा पुरस्कार सन्मान सोहळा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेना या सामाजिक संघटनेच्या वतीने. दिनांक १६ मार्च वार रविवारी रोजी. दुपारी तीन वाजता. परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा जवळ मस्तगड जालना या ठिकाणी चर्मकार समाज मेळावा. चे आयोजन करण्यात आले असून. या मेळाव्यामध्ये.. सत्कारमूर्ती.. प्रमुख मार्गदर्शक. अनुसूचित जाती कल्याण समितीचे अध्यक्ष. आमदार नारायण भाऊ कुचे.. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून. जालन्याचे माजी आमदार कैलाजी गोरंट्याल. यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक. प्राध्यापक अशोक अहिरे, राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय रविदास मार्ग परिवार संघटना.

प्रमुख पाहुणे. अनिल जी निंभोरे साहेब, सुभाष जी बरोदे, साहेब, बी एल बडगे. शिक्षण विस्तार अधिकारी, रमेश डोंगरे सर, भारतजी परमेश्वरी खुशालजी भवरे परशुरामजी इंगोले साहेब., सांडू जी आक्से, गोपाल जी बिरसोने, डी वाय ठोंबरे, रमेश बिरसोने, मोहन शेठ काकडे फुलचंदजी पसरटे वसंतरावजी देशमुख, बन्सीदासजी भगुरे, अनिल शिळगें, रमेश डोंगरे सर, हिरालालजी पारसकर, इंजिनीयर किशोर डोंगरे, बाबासाहेब सोनटक्के, शिवलाल अक्षय, इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष. अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष देविलाल बिरसोने, कार्य कार्यक्रमाचे आयोजक. जालना महानगर अध्यक्ष संतोष डोंगरे, मराठवाडा अध्यक्ष सुरेश गंगासागरे, जालना जिल्हाध्यक्ष कैलास खरात, शहराध्यक्ष अर्जुन पट्टे, यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहेत. तरी जालना जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे. असे आव्हान जालना महानगराध्यक्ष संतोष भाऊ डोंगरे यांनी केले आहे.

# बुरा ना मानो होली हैः.; मराठी कलाकारांनी 'अशी' साजरी केली धुळवड

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बुरा ना मानो होली हैःअसं म्हणत आज देशभरात धुळवड साजरी केली जात आहे. सर्वजण वेगवेगळ्या रंगात रंगून गेले आहेत. सर्वत्र आनंदात, उत्साहाने धुळवड साजरी केली जात आहे. कलाकार मंडळी देखील धुळवड साजरी करताना दिसत आहेत. मराठी कलाकार मंडळींनी आपल्या कुटुंबासह, मित्रपरिवारासह धुळवड साजरी केली. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करून कलाकारांनी चाहत्यांना धुळवडच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

हिंदू धर्मातील एक प्रमुख सण धुळवड आहे. धुळवड सण रंग, प्रेम आणि वसंत ऋतुचे एक प्रतिक आहे. या दिवशी सर्वजण एकमेकांना रंग लावून धुळवड साजरी करतात. त्यामुळे कलाकार मंडळीही रंगात रंगून गेल्याचं पाहायला मिळत आहेत. अभिनेता रितेश देशमुख, जिनिलीया देशमुख, आदेश बांदेकर, प्रसाद खांडेकर, हेमांगी कवी, श्रुती मराठे, गौरव घाटणेकर, अपूर्वा नेमळेकर, स्वरदा ठिगळे, वीणा जगताप अशा मराठी सिने व मालिकाविश्वातील कलाकारांनी धुळवड साजरी केली.

# आचार्य विशुध्दसागरजी महाराज ससंघाचे मंगल आगमन दि.१८ मार्च रोजी सायंकाळी श्री.क्षेत्र कचनेर येथे होणार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प.पु.समाधिस्त गणाचार्य विरागसारजी महाराज परमआत्मीय शिष्य आचार्यश्री विशुध्दसागरजी महाराज यांच्यासह ३० साधु संतांचे दिनांक १८ मार्च मंगळवार रोजी सायंकाळी श्री.क्षेत्र कचनेर येथे होणार असल्याची संभावना असल्याचे विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश कासलीवाल, विश्वस्थ मंडळाचे उपाध्यक्ष संजकुमार कासलीवाल व्यवस्थापकीय संचालक भरतकुमार ठोले व कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष सुनीलकुमार पाटणी महामंत्री निलेश काला, उपाध्यक्ष हेमंत बाकलीवाल, जयकुमार बाकलीवाल, उपमहामंत्री प्रकाशचंद गंगवाल यांनी सांगीतले.



प.पु.आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचा २०२४ चा चातुर्मास नांदणी कोल्हापुर येथे संपन्न झाला असुन त्यानंतर नांदणी, कुंथुगीरी, स्थवनिधी, श्रवणबेळगोळा (मोठी बाहुबली) या मार्गाने मुंबई येथील शिरसाड येथील पंचाकल्याणक संपन्न करून ते समाधिस्त आचार्य विरागसारजी महाराज यांच्या समाधीस्थळी जालना येथे दि.२१ ते २५ मार्च दरम्यान होणाऱ्या पंचकल्याणक महोत्सवासाठी विहार चालु असुन संगमनेर, शिर्डी, वैजापुर, गंगापुर या मार्गाने त्यांच्या संघाचे दि.१८ मार्च रोजी सायंकाळी श्री.क्षेत्र कचनेर येथे होणार आहे.

श्री.क्षेत्र कचनेर येथे दि.१८,१९,२० मार्च दरम्यान आचार्य संघाच्या सानिध्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विश्श्वस्थ मंडळ व कार्यकारणी मंडळाच्या वतीने देण्यात आले आहे.

सोलापुर येथील दोसी, गांधी, शहा परिवार या परिवाराला मुंबई, जालना तं इंदौर या मार्गावर मंगल विहाराचे सौभाग्य प्राप्त झाले आहे. तरी छत्रपती संभाजीनगर शहरातील बांधवांनी आचार्य विशुध्दसागरजी महाराज ससंघाचा आर्शिवादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचा २०१८ चा ऐतिहासिक चातुर्मास ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगरात येथे संपन्न झाला होता त्यावेळी त्यांचे शहरात मोठया प्रमाणावर भक्त परिवार जोडला गेला होता.

अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

# राज्य पत्रकार संघाच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर च्या वतीने शनिवारी (दि.८) मान्यवरांच्या उपस्थितीत आय एम ए हॉल, शनी मंदिर जवळ छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव, प्रादेशिक परिवहन अधिकारी पूजा वानखेडे, वरिष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य, पत्रकार डॉ. आरती श्यामल जोशी, लेखिका व समाजसेविका जयश्री एस. भगत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या सन्मान सोहळ्याचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ज्ञानेश्वर खंदारे, तर सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन पत्रकार सचिन लिला सुखदेव अंभोरे व कर्तृत्ववान महिलांचा परिचय प्राची प्रशांत सूर्यतळे यांनी केले. यावेळी ग्रामीण जिल्हा अध्यक्ष शांताराम मगर, मनोज पाटणी, प्रशांत सूर्यतळे, सुजित




ताजने , महेंद्र डेंगळे, विशाल सोनवणे, यांनी पुढाकार घेतला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महानगर अध्यक्ष उमेश जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**यांचा झाला सन्मान –** तेजश्री दिलीप पाचपुते, निर्मला निंभोरे, प्रविणा ताराचंद यादव, लता जाधव, डॉ. अर्चना चंद्रकांत गणवीर, अ‍ॅड. स्मिता प्रल्हाद जोंधळे, निता गंगावणे, सरला राजेश सदावर्ते, भाग्यश्री अण्णासाहेब जगताप, विद्या गावंडे, अ‍ॅड. प्रतिभा चौतमोल, दिव्या रमेश इंगळे, डॉ. सुषमा उन्मेष शिंदे, पृथा वीर, जयश्री एस. भगत, उज्ज्वला सुभाष साळुंखे, योगेश्वरी बाबुलाल बोहरे, डॉ. वर्षाराणी इंदानी-खोचे, अनु गंगाराम चव्हाण, कविता वाघ घुगे, पूजा वानखेडे, योगिता कृष्णा शिंदे, मनिषा वाघमारे, अनिता ज्ञानदेव फसाटे, सविता रत्नाकर कुलकर्णी, कल्पना इंद्रसिंग राजपूत, प्रा. भारती भांडेकर विश्वास. प्रमिला मुसळे, शुभलक्ष्मी महिला बचत गट शिवाजीनगर, उमा फुलारी, सीमा पाटील, चारुशीला, पत्रकार कल्याणी नागोरे आदी महिलांचा सन्मान करण्यात आला.


# तळीरी : विरारमध्ये खळबळ! सुटकेसमध्ये सापडलं महिलेचं मुंडकं; इतर अवयव गायब

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विरारमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. विरार फाट्याजवळील पिरकुंडा दर्ग्याजवळ एका सुटकेसमध्ये धड नसलेले महिलेचं मुंडकं आढळलं आहे. सध्या या घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून केला जात आहे. मात्र या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई अहमदाबाद महामार्गावरील विरारच्या शिरवली गावाजवळ ही घटना घडली. गुरूवारी रात्री हा प्रकार उघडकीस आला. गुरूवारी संध्याकाळी काही तरूणांचा ग्रुप मांडवी जवळील शिरवली गावात येथे जात होता. तेथे या तरूणांना एक सुटकेस दिसली. तरुणांनी सुटकेस उघडताच त्यामध्ये महिलेचं मुंडकं आढळलं. यामुळे एकच खळबळ उडाली. त्यांनी त्वरित ही बाब स्थानिक मांडवी पोलिसांना कळवली.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच मांडवी पोलिस घटनास्थळी दाखल झाले पोलिसांकडून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. प्राथमिक तपासानुसार, सदर महिला पश्चिम बंगालची रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, तिच्या शरीराचे इतर अवयव कुठे आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याचबरोबर, कलिना येथील फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी अधिकचा तपास केला. आता मुख्य आरोपी नक्की कोण आहे, याचाही पोलीस तपास घेत आहेत.


धावणी मोहल्ला येथील जयसुख पटेल यांच्या 'रामायण' या निवासस्थानी धुलिवंदन निमित्त हनुमंतरायाला विविध रंगाची सजावट करण्यात आली होती.

# देशात प्रथमच महाकाल मंदिरात होळी पेटवली



**देवाला** अर्पण करण्यात आला हरबऱ्याचा गुलाल; भोपाळमध्ये मुस्लिमांसह होलिका दहन. आज धुळेदिवशी पहाटे चार वाजता भस्म आरतीमध्ये पुजाऱ्यांकडून सर्वप्रथम बाबा महाकाल यांना गुलाल उधळण्यात येणार आहे. तसेच महाकाल मंदिरात वर्षातून दोनदा प्रभूच्या नित्यक्रमात बदल होतो. आरतीची वेळ कार्तिक कृष्ण प्रतिपदेला हिवाळ्यात असते. चैत्र कृष्ण प्रतिपदा उन्हाळ्यानुसार आरतीची वेळ ठरवली जाते.

या वेळी, चैत्र कृष्ण प्रतिपदा १५ मार्च (होळीचा दुसरा दिवस) पासून भगवान महाकालच्या दैनंदिन दिनचर्यामध्ये बदल होईल. या दिवसापासून उन्हाळा सुरू झाल्याचे मानले जाते. थंड पाण्याने भगवान महाकाल स्नान दिले जाईल. शरद पौर्णिमेपर्यंत थंड पाण्याने आंघोळीचा क्रम सुरू राहणार आहे. या काळात दररोज होणाऱ्या पाचपैकी तीन आरत्याच्या वेळाही बदलतील. याआधी गुरुवारी देशात प्रथमच महाकाल मंदिरात होळीचा सण साजरा करण्यात आला. यावेळी भगवान म हाकालाला केवळ एक किलो गुलाल अर्पण करण्यात आला. आरतीवेळी आयजी उमेश जोगा, जिल्हाधिकारी नीरज सिंह आणि प्रशासक प्रथम कौशिक उपस्थित होते.

संध्याकाळच्या आरतीनंतर ओंकारेश्वर मंदिराबाहेर होलिका दहन करण्यात आले. त्यासाठी काठ्यांपासून होलिका बनवण्यात आली. यावेळी भाविकांना होलिका दहन स्थळाच्या पलीकडे जाण्यास मज्जाव करण्यात आला. भोपाळमध्ये मुस्लिम बांधवांसोबत होलिका दहन करण्यात आले. बुरहानपूरमध्ये ३१०० हंड्यांची होळी करण्यात आली.

**दरवर्षी होलिका दहन का केले जाते? –** दैत्य राजा हिरण्यकश्यपूच्या सांगण्यावरून त्याची बहीण होलिका भगवान नारायणाचा प्रखर भक्त प्रल्हादसोबत अग्नीत बसली, त्यानंतर भगवान विष्णूच्या कृपेने प्रल्हाद अग्नीपासून सुरक्षित राहिला. होलिका जळून राख झाली. त्यानंतर वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक म्हणून दरवर्षी होलिका दहन केले जाते.

**विश्वास – नकारात्मक ऊर्जा प्रसारित केली जाते –** धार्मिक ग्रंथांमध्ये असे मानले जाते की होलिका दहनाच्या वेळी वातावरणातून नकारात्मक ऊर्जा दूर होते. संवाद घडतो. त्याचा नाश करण्यासाठी एखाद्या धार्मिक किंवा शुभ स्थानावर काही काळ थांबावे. अशा वेळी घरी गेल्याने घरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तसेच, घरातील सदस्यांसाठी ते शुभ मानले जात नाही.


छत्रपती संभाजीनगरात धुलिवंदनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थान गणपतीपासून निघणाऱ्या रॅलीत तरूणांनी सहभाग घेतला.




चिमुकल्यांनी कोरड्या रंगांनी धुलिवंदनाचा सण साजरा केला.


चिमुकल्यांनी कोरड्या रंगांनी धुलिवंदनाचा सण साजरा केला.


शाळेत चिमुकल्यांनी रंग उडवत धुलिवंदनाचा सण साजरा केला.


शाळेत चिमुकल्यांनी रंग उडवत धुलिवंदनाचा सण साजरा केला.


सिहोर - येथे होलिका पूजन करताना पंडीत प्रदीपजी मिश्रा.


खुलताबादेत धुलिवंदनाचा सण साजरा करताना कॉलनीतील नागरिक

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.
• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003
• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816